## थोडक्यात...

### मोबाईलमध्ये सट्टा जुगार खेळताना एकास अटक

**अमळनेर। प्रतिनिधी–**

मोबाईलमध्ये सट्टा जुगार खेळवून पैसे स्वीकारताना पोलिसांनी एकाला रंगेहाथ पकडून मोबाईलमधील सात नावे शोधून त्यांच्यावरही कारवाई केल्याची घटना १० रोजी सायंकाळी साडे पाच वाजेच्या सुमारास घडली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम याना गोपनीय माहिती मिळाली की मच्छी मार्केट च्या भिंतीच्या आड बोरसे गल्लीतील रहिवासी दिवाकर पांडुरंग ठाकूर (वय ३३) हा मोबाईलमध्ये मिलन नावाचा सट्टा जुगार खेळवत असल्याची माहिती मिळताच त्यांनी हेडकॉन्स्टेबल अशोक साळुंखे, अमोल पाटील, जितेंद्र निकुंभे यांना धाड टाकायला पाठवले तेव्हा दिवाकर सट्टा जुगार खेळताना आढळून आला. त्याच्याजवळील मोबाईल तपासला असता तो संजू बाबा या नावाच्या व्हाट्सअप ग्रुपवर आकडे आणि पैश्यांचे व्यवहार आढळून आले. पोलिसांनी त्यातील नाव नम्बर शोधली असता अडमिन अदनान शेख, आकाश उर्फ डॅनी जेधे, नाना चौधरी, मनी, डी, संजुबाबा असे आढळून आले. अमोल पाटील यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार कलम १२ अ प्रमाणे दिवाकर सह व्हाट्सएप ग्रुप ऍडमीन असे सात सदस्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास हेडकॉन्स्टेबल विनोद भोई करीत आहेत.




### पहूर येथे भगवान महावीर जयंती उत्साहात

**पहूर, ता. जामनेर। वार्ताहर –**

अखिल विश्वाला अहिंसेचा संदेश देणारे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांची जयंती पहूर येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . या निमित्त दिलीप बेदमुथा यांच्या निवासस्थानापासून आराधना भवनपर्यंत भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

यावेळी ८० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठांचा सत्कार करण्यात आला . मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदीप लोढा यांच्या आर्थिक योगदानातून आराधना भावना वरील इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून त्याचा भूमिपूजन सोहळा याप्रसंगी करण्यात आला. वर्षभरात इमारत पूर्णत्वास येणार असल्याचे त्यांनी सांगितले . आराधना भवनच्या समोर शेड उभारल्याबद्दल इंदरचंद छाजेड यांचा सत्कार करण्यात आला. किशोर कोटेचा यांनी सूत्रसंचालन केले. प्रवीण लोढा, संघपती हिरालाल छाजेड , किशोर लोढा, विरेंद्र लोढा, जैन युवा संघटनेचे शहर अध्यक्ष स्वप्निल छाजेड, आशुतोष लोढा, राजेंद्र खोबरे, सुनील लोढा, दर्शन लोढा यांच्यासह पहूर आणि लोंढरी येथील जैन बंधू-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते .भगवान महावीर स्वामी यांचा अहिंसेचा संदेश देत मिरवणूक शांततेत पार पडली . पहूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भरत दाते यांच्यासह पोलीस पथकाने मोलाचे सहकार्य केले.

## मोहाडी येथे मक्याच्या शेताला आग, १३ लाखांचे नुकसान; दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**पारोळा । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोहाडी येथील शेतकऱ्यांच्या शेतात शेजारील शेतकऱ्याने त्याच्या शेतात असलेले काळीकचरा जाळत असताना शेजारीच असलेले मक्याचे शेताला आग लागून सुमारे १३ लाख रुपयाचा मक्का जळून खाक झाला तर शेतकरी आग विझवताना जखमी झाला असून दोन जणांविरुद्ध दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पारोळा पोलीस ठाण्यात आनंदा महादू पाटील यांनी फिर्याद दिली की,विठठल किसन पाटील व विनोद विठठल पाटील दोन्ही रा. मोहाडी ता. पारोळा यांनी जाणिवपुर्वक त्यांचे शेतात बांधावर काडी कचरा पेटवुन सदर ची आग आमचे शेताकडेस पसरवुन आमचे शेतातील तसेच आजु बाजुचे शेतकरी देवेंद्रसिंग धर्मासिंग जाधव, प्रमिलाबाई भावसिंग सोमोसे, रविंद्र भावसिंग सोमोसे यांचे शेतात सुध्दा मका कापुन ठेवलेला होता.

त्या दिशेने आग पसरुन संपुर्ण शेतातील मक्याचे पिक तसेच मक्याचे पिक, पाणी भरण्याचे ठिंबक नळ्या, पाईप लाईन चे पाईप तसेच सौरउर्जा प्लेट जळून खाक झाले.

वरील वरील दोघं आरोग्य त्यांनी शेतात आग लावून सदर ची आग पसरून आमचे शेतातील पिकाचे तसेच इतर साहित्याचे नुकसान होईल याची जाणिव असतांना आग लावली त्यामुळे माझे व इतर शेतक-याचे मक्याचे पिकाचे अंदाजे १३ लाख रू व शेती साहित्याचे नुकसान झाले असुन आनंदा पाटील यांना आग विझवितांना चेहऱ्यावर दुखापत झाली असून पारोळा पोलिसात विठठल किसन पाटील व विनोद विठठल पाटील दोन्ही रा. मोहाडी यांचे विरूध्द पारोळा पोस्टे सी.सी. टी.एन. गुरन ७६/२०२५ भा. न्याय संहिता कलम ३२६ (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल कैलास साळुंखे हे करीत आहेत.

## मारवड येथे खळ्यांना आग; लाखोंचे नुकसान

**अमळनेर। प्रतिनिधी**



तालुक्यातील मारवड येथे डांगरी रस्त्याला असलेल्या खळवाडीस अचानक आग लागल्याची घटना ११ रोजी दुपारी तीन साडे तीन वाजेच्या सुमारास घडली. अचानक लागलेल्या आगीत पाच ते सहा शेतकऱ्यांच्या खळ्यातील शेती साहित्य, एकाचे ट्रॅक्टर, चारा, लाकडी अवजारे आदि साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले आहे.

**अग्निशमन दलाचा सिंहाचा वाटा**

आगीचे वृत्त कळताच पालिकेचे मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी दोन अग्निशमन बंब पाठवले तसेच चोपडा एरंडोल आणि धरणगाव येथील बंब देखील मागवले. अग्निशमन दलाचे कर्मचारी गणेश गोसावी, दिनेश बिऱ्हाडे, फारुख शेख, जफर पठाण, मच्छीन्द्र चौधरी, आनंद झिम्बल, आकाश बाविस्कर,भिका संदानशीव यांनी आग विझवली. सुदैवाने शेतकऱ्यांनी आपापली जनावरे तेथून काढून घेतल्याने गुरांचे नुकसान झाले नाही.

**तरुणाई सरसावली**

आगीचे वृत्त समजताच गावातील नळांना पाणी सोडण्यात आले. गावातील तरुण धावत आले आणि कोणी पाणी टाकत होते ,कोणी चारा मोकळा करून पाणी मारत होते , कोणी पावडीने चारा आवरत होते , बादल्या भरून भरून आग विझवण्यासाठी धावत होते. अग्निशमन दलाच्या गाड्या येण्यापूर्वी तरुणाईने केलेले धाडस आणि तत्परता कौतुकास्पद होती.

घटनेचे वृत्त कळताच उपविभागीय अधिकारी नितीनकुमार मुंडावरे, एपीआय जीभाऊ पाटील, मारवड पोलीस, तलाठी महेंद्र भावसार, मंडळाधिकारी, गावकऱ्यांसह विलास पाटील, उमाकांत साळुंखे यांचे सहकार्य लाभले. सुमारे सात शेतकऱ्यांचे खळे व शेती साहित्य जळून पूर्ण खाक झाले.

## चाळीसगाव पोलिसांकडून दरोड्यासह चोरीचा गुन्हा उघडकीस

**चाळीसगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पातोडा गावात पडलेल्या दरोड्याचा गुन्हा १२ तासात उघड करण्यात चाळीसगाव पोलीसांच्या पथकाला यश आले आहे, तर खरजई येथील चोरी करणाऱ्या आरोपींना देखील अटक करण्यात आली आहे. चाळीसगाव पोलीसांच्या या कामगिरीचे कौतूक केले जात आहे. दरोड्याच्या आरोपीकडून ७८,६०० रुपयांचा मुद्देमाल हस्त केला असल्याची माहिती पत्रपरिषदेत पोलिसांकडून देण्यात आली.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, तक्रारदार अनुसया रघुनाथ माळी, वय ६० वर्षे रा. पातोंडा यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चाळीसगांव शहर पो.स्टे. गुरनं. ११५/२०२५ बिएनएस ३०४(२),३(५) प्रमाणे दिनांक ०९/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी यांचे रहाते उघड्या घरात प्रवेश करुन अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीस दमबाजी करुन फिर्यादीचे अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण ४२ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला होता. गुन्ह्याची माहीत प्राप्त होताच पोलीस पथक असे घटनास्थळी रवाना होवुन तेथे आज्ञात आरोपीतांचा मागोवा घेवुन लागलीच पोलिसांच्या पथकाने आरोपी अमोल कडबा भोसरे (वय २०) , शरद सुधाकर चव्हाण, (वय २०) , सुधिर मल्लप्पा चव्हाण (वय २०), अभिशेख भोसले सर्व रा. मगरुळ तांडा ता.जितूर जि. परभणी व एक विधीसंघर्षीत बालक अश्यांनी केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी एक विधि संघर्ष बालक यांस बाल न्याय मंडळ यांचे कडेस हजर करण्यात येवुन आरोपीतांची पोलीस रिमांड घेवुन, त्याचे कडुन गुन्ह्यातील चोरी गेलेल्या माला पैकी ७८ हजार ६०० रुपये कि.चा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी ,पोलीस उप निरीक्षक संदिप घुले, पोहेकॉ अजय पाटील, राकेश पाटील राहुल सोनवणे, योगेश बेलदार विजय पाटील, नरेंद्र चौधरी अश्या पथकाने केल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

दुसऱ्या गुन्हात अमोल माधवराव म्हसके, वय ३८, धंदा नोकरी रा. खरजई ता. चाळीसगांव ता. चाळीसगांव ह.मु. शिवाजी नगर, खरजी नाका, चाळीसगांव यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चाळीसगांव शहर पो.स्टे. गुरनं. ७२/२०२५ बिएनएस ३०५,३(५) प्रमाणे दिनांक ०७ मार्च २५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. फिर्यादी यांचे रहाते घरातुन कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी १ लाख ६८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरीस गेल्याबाबत तक्रार दिली आहे. सदर गुन्ह्याचे तपासी अंमलदार पोहेकॉ प्रशांत पाटील यांना तपासा दरम्यान माहीती प्राप्त झाली कि, आरोपी अक्षय गुलाब कडवे, (वय २१) वर्षे. यश बापु मुलमुले, (वय १९ वर्षे) दोन्ही रा. खरजई ता. चाळीसगांव यांनी सदरचा गुन्हा केलेला आहे. पोलिसांच्या पथकाने आरोपींचा शोध घेवुन नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. सदर आरोपीतांचा मा. कोर्टाकडुन पोलीस कस्टडी घेवुन त्यांच्याकडुन चोरीस गेलेला माला पैकी १८ हजार रु.कि. चा ३ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपीतांच्या पोलीस कस्टडी दरम्यान नमुद गुन्ह्याचा इतर माल व त्यांनी यापुर्वी त्याचेवर अश्यांच प्रकारचे दोन गुन्हे दाखल असल्याची प्राथमिक माहिती प्राप्त आहे. या दोन्ही गुन्हाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

दरम्यान चाळीसगाव पोलिसांकडून सदरच्या गुन्हांची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. परंतू फक्त गुन्हांची धावती माहिती देवून, पत्रकारपरिषद आटोपती घेतली. पत्रकारांना सदर गुन्हांच्या उकलीबाबत प्रश्न विचारण्यासाठी वेळच दिला नाही, त्यामुळे गुन्हांचे खरे स्वरुप काय होते, आरोपीला कुठल्या माहितीच्या आधारे अटक केली, याबाबत सविस्तर माहिती प्राप्त होवू शकली नाही.




